# मार्गदर्शन आणि प्रज्ञान

## श्रीगुरुमाईंसोबतचे प्रसंग

### आनंदमय जन्मदिवसाच्या निमित्ताने

श्रीगुरुमाईंसोबतचा प्रसंग : १

लीलावती स्टुअर्ट सट्क्लिफ

काही वर्षांपूर्वी मी माझ्या कुटुंबासमवेत गुरुदेव सिद्धपीठात गेले होते आणि त्यावेळी गुरुमाईंनी मला एक सुंदर कार्ड दिले. माझ्या जीवनात घडत असलेल्या बदलाचा आणि आव्हानाचा तो काळ होता, ज्यांना मी धैर्याने सामोरी जात होते आणि गुरुमाईंना माझ्या या संघर्षाची पूर्ण कल्पना होती. मला दिलेल्या कार्डमध्ये गुरुमाईंनी लिहिले होते, "जेव्हा जग अंधकारमय आहे असे भासते, तेव्हा महान आत्म्यांचे शब्द निश्चितच व्यक्तीच्या मनातील अंधाऱ्या कोपऱ्यांना उजळून टाकतात." गुरुमाईंच्या या संदेशाने माझ्या अंतरंगावर खोलवर परिणाम केला — माझे विचार आणि भावना याविषयीचा माझा दृष्टीकोन बदलून टाकला. माझ्या असे लक्षात आले की, काही विशिष्ट परिस्थितींविषयी जेव्हाही माझ्या मनात निराशादायक, अंधकारमय विचार आणि भावना येतील, तेव्हा माझ्या बोधाचे 'अंधारलेले कोपरे प्रकाशाने उजळून निघावेत,' या उद्देशाने मी गुरुमाईंची पुस्तके किंवा सिद्धयोगाचे इतर मुलभूत शास्त्रग्रंथ वाचू शकते.

मी ज्या-ज्यावेळी असे करते, त्या प्रत्येक वेळी अचूकतेने माझ्या अनुभवास येते की, मी माझ्या मनात ज्ञानदीप प्रज्वलित केला आहे. ज्या परिस्थितींशी मला झगडावे लागत असते त्यांच्याविषयी विचार करण्याच्या आणि त्यांना समजून घेण्याच्या अधिक बोधपर मार्गांचा शोध मला लागतो. एखाद्या विशिष्ट परिस्थितीविषयी ज्ञान प्राप्त करण्यासाठी जेव्हा मी वाचन करत असते, तेव्हा मला वाटते की, मी अक्षरशः सत्याच्या प्रकाशाने माझ्या मनाला स्नान करवते आहे. वाचन आणि मनन केल्यानंतर मी पुस्तकावरून किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनवरून माझी दृष्टी जेव्हा वळवते, तेव्हा सर्व काही हलकेफुलके आणि सुस्पष्ट झालेले असते. मनातील अंधकार नाहीसा झालेला असतो. असे वाटते जणू मनावरील संपूर्ण ओझेच उतरून गेले आहे!

अगदी अलीकडच्याच काळात, अतिशय खिन्न मनःस्थितीचा अनुभव करत असलेल्या माझ्या आजारी वडीलांसोबत मी काही काळ व्यतीत केला. आजारी पडल्यानंतर माझे वडील वयस्कर लोकांची देखभाल करणाऱ्या सेंटरमध्ये राहायला गेले होते, जेणेकरून त्यांना काही मदत प्राप्त होईल. खंबीर आणि स्वाधीन असण्यापासून ते शारिरीकदृष्ट्या कमजोर आणि हतबलतेची जाणीव होत गेलेले, असे ते बनत गेले. त्यांनी स्वतःचे हे दुःख ज्यावेळी माझ्यासमोर व्यक्त केले, त्यावेळी मी त्यांना एक कविता वाचून दाखवण्याविषयी विचारले. त्यांनी संमती दर्शवताच मी माझ्या मोबाईल फोनमध्ये गुरुमाईंची 'साक्षीभाव' ही कविता उघडली, जी सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर प्रसारित केली गेली होती. त्या कवितेचे अगदी थोडेच शब्द वाचल्यानंतर मी माझ्या वडीलांचा चेहरा पाहू शकत होते. पूर्वी तणावपूर्ण दिसत असलेला त्यांचा चेहरा आता तणावरहित झाला होता. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य पसरत असल्याचेही मला दिसून आले. वाचनाच्या अखेरीस, माझे वडील शांत झाले होते आणि त्यांची चिडचिड नाहीशी झाली होता. तीच कविता पुन्हा एकदा वाचून दाखवू का असे मी त्यांना विचारले असता, ते म्हणाले, "हो, जरूर वाच." मी जसजशी ती कविता पुन्हा वाचत गेले, तसतसा माझ्या वडीलांचा चेहरा पुन्हा आनंदाने आणि उत्साहाने उजळून गेला आणि त्यांना त्यांच्याच अंतरातील अधिक शांत स्थानाकडे वाटचाल करताना मी पाहत राहिले. माझ्या वडीलांना बरे वाटते आहे हे पाहणे अत्यंत भावस्पर्शी होते.

मी गुरुमाईंचे शब्द वाचत असताना, वडीलांची ही अवस्था जाणून घेण्याच्या माझ्या पद्धतीत बदल झाला होता, हेदेखील माझ्या लक्षात आले. मी जेव्हा त्यांना पहिल्यांदा भेटले होते, तेव्हा मी अतिशय उदास झाले होते आणि त्यांच्या त्यावेळी असणाऱ्या स्थितीविषयी अत्यंत अस्वस्थ झाले होते. जसजसे मी वाचन करत गेले आणि माझे वडील ऐकत गेले, तसतशी माझी मानसिकता बदलत गेली. माझ्या वडीलांच्या जीवनात ज्या गोष्टी घडत होत्या त्यांच्याविषयी शांत स्वीकृतीचा अनुभव मला येऊ लागला होता. माझे लक्ष आमच्या दोघांच्या अंतरात काय घडते आहे यावरच अधिकतेने केंद्रित झाले होते. आमच्या स्वतःच्याच हृदयाशी जोडले गेल्याची भावना तिथे होती.

दररोज, मी त्यांना जेव्हा भेटत असे, तेव्हा मी त्यांना गुरुमाईंची कविता वाचून दाखवण्याविषयी विचारत असे आणि प्रत्येक वेळी, माझ्या वडीलांचा चेहरा प्रफुल्लित होत असे. कविता ऐकत असताना त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटत असे आणि ते विशिष्ट शब्दबंधांविषयी स्वीकृतीदर्शक व बोधात्मक हुंकार देत असत. गुरुमाईंच्या कवितेतील सूचनांचे पालन केल्यामुळे माझ्या वडीलांच्या जीवनात

प्रकाश पसरत चालला आहे हे मी पाहू शकत होते. मी पाहिले आहे की, गुरुमाईंनी त्यांच्या कवितेतून माझ्या वडीलांना देऊ केलेल्या 'मुक्त व्हा. तुमच्या शरीराला तणावमुक्त होऊ द्या,' या आमंत्रणाला ते आलिंगन देत होते. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर असताना अत्यंत खडतर अशा या बाह्य परिस्थितींमध्येदेखील स्वतःमध्ये प्रशांतीला कसा प्रवेश घेवू द्यावा हे शिकताना मी त्यांना पाहत होते. मी जसजसे गुरुमाईंचे शब्द वाचत असे, तसतसे मी आणि माझे वडील दोघेही गुरुमाई कशाचे वर्णन करत आहेत याची कल्पना करू शकत होतो. प्रदीर्घ काळ आम्ही मौन राहत होतो, सुंदर अशा शांतीच्या आणि प्रकाशाच्या अवकाशात एकमेकांच्या संगतीत रममाण होत — जिथे दुःख नव्हते अशी स्थिती.

यानंतर काही आठवड्यांनी माझ्या वडीलांना देवाज्ञा झाली. आज जसे मला माहित आहे तसेच तेव्हाही मी हे जाणत होते की, माझ्या वडीलांना गुरुमाईंचे शब्द ऐकल्यामुळे व त्या शब्दांवर मनन केल्यामुळे गुरुमाईंची कृपा आणि आशीर्वाद प्राप्त झाले होते. त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस, माझे वडील त्यांच्या हृदयाच्या प्रशांतीत विश्रांत होवू शकले आणि स्वतःतच शांततेचा अनुभव घेवू शकले.

गुरुमाईंच्या या जगतातील उपस्थितीसाठी माझ्या मनात निःसीम कृतज्ञता आहे. प्रत्येकाला गुरुमाईंचे चैतन्यमय शब्द वाचण्याचे किंवा ऐकण्याचे भाग्य लाभो, जे निश्चितच गुरुमाईंची कृपा आणि आशीर्वाद प्रदान करतात.

श्रीगुरुमाईंसोबतचा प्रसंग : २

गरिमा बोरवणकर

माझे बालपण भारतातील लखनऊ शहरात गेले. त्यावेळी मी अतिशय शांत आणि लाजाळू होते. जसजसे माझे वय वाढत गेले, तसतसा माझा स्वभाव अधिकच लाजाळू व संकोची होत गेला. मला आठवते की, कोणत्याही प्रसंगी मला अशी भीती वाटत राहायची की, एखाद्याचे लक्ष माझ्याकडे तर वेधले जाणार नाही ना. मला कळतच नव्हते की, माझ्या या संकोची आणि लाजाळू स्वभावाच्या या घट्ट पकडीतून मी स्वतःची सुटका कशी करून घ्यावी?

वर्ष १९८४मध्ये किशोरावस्थेत असताना, मी माझी बहीण वाणी अग्रवाल हिच्यासमवेत गुरुदेव सिद्धपीठात दीर्घकालीन व्हिजीटींग सेवाकर्ता होते. गुरुदेव सिद्धपीठातील इतर सेवाकर्त्यांसोबत बोलताना किंवा त्यांना भेटताना मला अतिशय सहजता जाणवत असे; प्रत्येकजण अतिशय उदार अंतःकरणाने वागत असे.

एके दिवशी संध्याकाळी, मला एका सत्संगाचे सूत्र संचालन करण्याच्या सेवेसाठी आमंत्रित केले गेले, जो दुसऱ्याच दिवशी सकाळी होणार होता. मागचापुढचा विचार न करता, आणखी जास्त सेवा अर्पण करण्यासाठी मिळत असलेल्या या सुसंधीचा मी ताबडतोब स्वीकार केला!

नंतर मला लक्षात आले की, मी काय करून ठेवले होते. नाही! नाही! सर्वांसमोर बोलणे! माझ्या पोटात भीतीचा एक चितपरिचित गोळा उठला. जेव्हा मी अशी कल्पना केली की, मी एका जनसागरासमोर उभे राहून बोलते आहे, तेव्हा मला आणखीनच जास्त भीती वाटायला लागली. मात्र, या भावनेत अडकून राहण्यासाठी माझ्याकडे फार वेळ नव्हता. मला माझ्या कोचबरोबर दुसऱ्या दिवशी सकाळी होणाऱ्या कार्यक्रमाच्या तयारीवर लक्ष केंद्रित करायचे होते. मी माझ्या मनात ही समज ठामपणे कायम ठेवली की, सेवा करण्याची कोणतीही संधी ही महान सद्‌भाग्याची बाब असते आणि गुरुमाईंच्या कृपेच्या अनेक वास्तविक आणि रूपांतरणकारी अनुभवांची मी आठवण केली, जे मला सेवेच्या अभ्यासाद्वारे प्राप्त झाले होते. गुरुमाईंच्या कृपेवर आणि आशीर्वादांवर माझी दृढ श्रद्धा होती. त्यामुळे तयारी करत असताना मी गुरुमाईंकडे मदतीची याचना करत राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी, मी गुरुचौकातून प्रोग्रामिंग ऑफिसकडे जात होते. प्रोग्रामिंग ऑफिसला आता लाईव्ह इव्हेंटस् डिपार्टमेंट म्हटले जाते. मी ॐ नमः शिवाय मंत्राचा जप करत जात होते. मी पाहिले की, गुरुमाई बाबा मुक्तानंदांच्या समाधी मंदिराबाहेर उभ्या आहेत. त्यांना तिथे पाहून मला खूपच आनंद झाला! मी गुरुमाईंना प्रणाम केला आणि त्यांना अभिवादन केले.

गुरुमाईंनी मला विचारले की, मी कुठे जाते आहे. मी सांगितले की, मी प्रोग्रामिंग ऑफिसकडे जाते आहे. मग मी गुरुमाईंना सांगितले की, त्या दिवशी होणाऱ्या सत्संगाचे सूत्र संचालन करण्याच्या सेवेविषयी मला खूपच भीती जाणवते आहे आणि मग मी त्यांच्याकडे आशीर्वाद मागितले. गुरुमाईंच्या चेहऱ्यावर मोठे असे प्रेमपूर्ण आणि स्नेहपूर्ण हसू पसरले. त्यांनी मला विचारले की, मला कसे वाटते आहे. मी त्यांना सांगितले की, मला खूपच अस्वस्थता जाणवते आहे आणि ती अस्वस्थता इतकी जास्त आहे की, जणू काही माझ्या पोटात गोळा उठतो आहे.

त्याच तेजपूर्ण हास्यासह गुरुमाईंनी आपला हात पुढे केला व माझ्या पोटावरून फिरवण्यास सुरुवात केली. हात फिरवता-फिरवता त्या म्हणाल्या, "ही भीती नाही. ही तर शक्ती आहे, जी तिच्या उपस्थितीची जाणीव तुला आपल्या अंतरंगात करून देते आहे. ती तुझ्या मदतीसाठी आहे. विश्वास ठेव. सर्व काही ठीक होईल." माझ्या चेहऱ्यावर हसू पसरले. माझ्या अंतरातील खळबळ कमी होऊ लागली आणि मला आतून आनंदाचे भरते येत असल्याची भावना जाणवली. गुरुमाईंनी आपला हात माझ्या खांद्यावर ठेवला आणि म्हणाल्या, "आता तू जा. तुला उशीर व्हायला नको." मी हात जोडून नमस्कार केला आणि वेगाने प्रोग्रामिंग ऑफीसच्या दिशेने चालू लागले. त्या अनमोल क्षणांमध्ये सर्वकाही बदलून गेले होते. माझे हृदय प्रेमाने भरून गेले होते आणि प्रत्येक पावलागणिक माझा आत्मविश्वास वाढतच गेला.

सत्संगाचे सूत्र संचालन करण्याचा हा अनुभव अतिशय आनंददायी होता. माझ्या हृदयातील प्रेम ओसंडून बाहेर वाहत होते. मी स्वतःलाच ओळखू शकत नव्हते. मी आश्चर्यचकित झाले होते.

त्या दिवसापासून मी अनेक सत्संगांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये सूत्र संचालन व भाषांतर करण्याचे काम केले आहे. आणि ज्यावेळी मी अशा एखाद्या परिस्थितीत असते की, ज्यावेळी माझ्या पोटात गोळा उठू लागतो, त्यावेळी मी गुरुमाईंच्या शब्दांचे स्मरण करते. मी शक्तीच्या उपस्थितीला ओळखू शकते. मी त्या शक्तीचा अनुभव प्रेम आणि आनंद यांच्या रूपात करते आणि मला माहित असते की, सर्व काही ठीक होईल.

## गुरुमाईंसोबतचा प्रसंग : ३

लीलावती स्टुअर्ट

वर्ष १९८३च्या उन्हाळ्यात, ज्यावेळी मी २१ वर्षांची होते, त्यावेळी मी श्री मुक्तानंद आश्रमात सेवा अर्पण करण्यासाठी गेले होते. मी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले होते पण मी विद्यापीठात दाखल होऊ इच्छित नव्हते. माझी इच्छा होती की, माझे जीवनच माझे विद्यापीठ असावे! मात्र, मला हे कळत नव्हते की, पैसे कमवण्यासाठी मला कोणते काम करायचे आहे. मला वाटत होते की, माझे मन अस्थिरतेने इकडून तिकडे भटकते आहे; तो माझ्याकरता अत्यंत अस्वस्थ करून सोडणारा काळ होता.

एके दिवशी संध्याकाळी सत्संगापूर्वी, गुरुमाई अनुग्रह भवनामध्ये भगवान नित्यानंद मंदिराच्या शेजारच्या परिसरात काही लोकांना भेटत होत्या. मी जवळच उभी होते. जिथे मी उभी होते ते स्थान मला अगदी अचूक आठवते आहे, जणू काही तो कालचाच प्रसंग असावा.

मी तिथे उभी राहून गुरुमाईंकडे पाहात होते आणि त्यावेळी माझ्या मनात अशी इच्छा निर्माण झाली की, माझ्या भविष्याविषयी मला स्पष्टपणे माहित व्हावे. त्याच वेळी गुरुमाईंनी माझ्याकडे वळून पाहिले आणि त्यांनी मला पुढे येण्यास सांगितले.

गुरुमाईंनी मला सांगितले की, त्या हे जाणतात की, मला काहीतरी योगदान करावेसे वाटते आहे आणि माझ्या जीवनाच्या माध्यमातून काही परिवर्तन करावेसे वाटते आहे. गुरुमाईंनी सांगितले की, यशस्वी होण्यासाठी मी जे काही करते आहे, त्यासाठी माझे प्रयत्न शत प्रतिशत असायला हवेत. आणि हे शत प्रतिशत देणे, माझ्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात लागू केलेले असले पाहिजे : माझ्या कुटुंबात, माझ्या नातेसंबंधांत, माझ्या शिक्षणात, माझ्या कामात आणि मी अर्पित करत असलेल्या सेवेत — सर्वांमध्ये. मी जर एक प्रतिशत दिले, तर त्याच्या मोबदल्यात मला एक प्रतिशतच परत मिळेल. गुरुमाईंनी सुचवले की, मी याबद्दल विचार करावा!

जेव्हा मी गुरुमाईंना हे बोलताना ऐकत होते, तेव्हा माझ्या संपूर्ण अस्तित्वानिशी मला हे समजत होते की, हे मार्गदर्शन माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहे. मला जाणवले की, माझे पाय स्वतःला जमिनीवर दृढपणे रोवत आहेत, जणू काही ते मला तिथेच स्थिर करत होते. आता माझ्याकडे भरकटण्याचे काही कारणच उरले नव्हते. मला आठवते, नंतर मी विचार करत होते की, अशा प्रकारे गुरुमाईंचे शब्द ग्रहण करण्यासाठी स्वतःला संपूर्ण स्थिरतेमध्ये खिळवून ठेवण्यात, माझ्या शरीराने किती शहाणपण दर्शवले होते.

त्यानंतर संध्याकाळी, मी गुरुमाईंच्या उपदेशावर चिंतन करण्याकरता माझ्या खोलीत गेले. मला वाटले, ‘सर्व गोष्टींकरता शत प्रतिशत देणे सोपे असेल!’ परंतु, नंतर माझ्या मनात विचार आला, ‘शत प्रतिशत देण्याचा खरोखर काय अर्थ आहे? मी कुठे आणि कशी सुरुवात करावी?’ काही क्षणातच — शत प्रतिशत देणे सोपे असते असे म्हणणारी मी, पुढे स्वतःला सांगू लागले होते की, हे कार्य तर फारच मोठे आहे! पण माझ्या स्वतःच्या अनुभवांमुळे आणि इतर लोकांच्या ऐकलेल्या अनुभवांमुळे मी हे जाणत होते की, गुरुमाई अशी कोणतीही गोष्ट मला करायला सांगणार नाहीत की, जी मी करू शकणार नाही.

मला माहीत होते की, गुरुमाईंच्या उपदेशाचे पालन करण्यासाठी, त्यांची कृपा सतत माझ्याबरोबर असेल आणि मला साहाय्य करेल.

माझ्या चिंतांविषयी विचार करत राहण्याऐवजी मी ठरवले की, मी गुरुमाईंच्या शब्दांवर ध्यान करेन आणि त्यांचे मार्गदर्शन स्वतःच्या हृदयात सौम्यपणे धारण करेन : मी फक्त त्यांच्या शब्दांच्या सहवासात राहीन. आणि मग हा विचार माझ्या मनात आला : मला आता यापुढे जे कोणतेही कार्य करावयाचे आहे, त्यावर मी शत प्रतिशत आपले लक्ष एकाग्र करायला सुरुवात करेन. माझे पुढचे कार्य होते, दात घासणे. म्हणून रोजप्रमाणे ब्रश करण्याऐवजी — म्हणजे केवळ माझे रोजचे एक काम उरकारचे म्हणून दात घासण्याऐवजी, मी ते अतिशय लक्षपूर्वक व एकाग्रतेने घासले. मग त्यानंतरचे काम होते माझ्या कपड्यांचा खुर्चीवर केवळ एक ढीग करून न ठेवता, त्यांच्या घड्या करून ते व्यवस्थित ठेवणे. नंतर जेव्हा मी सकाळी उठले, तेव्हा मी ब्लँकेट अंथरूणावरच फेकून देण्याऐवजी, माझे अंथरूण नीट आवरून ठेवले. आणि अशा प्रकारे मी प्रत्येक कार्याला शत प्रतिशत देण्यास सुरुवात केली.

मी जेव्हा मेलबोर्न, ऑस्ट्रेलियातील माझ्या घरी परत आले, तेव्हा मी माझ्या जीवनातील सर्व क्षेत्रात गुरुमाईंचे मार्गदर्शनाचे अनुसरण करणे सुरू ठेवले. उदाहरणार्थ, मी एका अतिशय चांगल्या रेस्टॉरंटमधील वेट्रेसच्या माझ्या कामावर परत आले. पूर्वी मी साखरेच्या एखाद्या रिकाम्या भांड्याशेजारून जात असताना, स्वतःला हे सांगत असे की, 'कोणीतरी ते भांडे साखरेने भरून ठेवेल.' अथवा मीठ व मिरपूडीच्या डब्यांवर एखाद्याच्या हाताच्या खुणा मी पाहून विचार करत असे, 'जाऊ दे; हे कोणीच पाहणार नाही!'

आता मात्र, जेव्हा या गोष्टींकडे माझे लक्ष जायचे, तेव्हा मी शत प्रतिशत स्वतःला त्या कामात देत असे. मी साखरेचे रिकामे भांडे भरून ठेवू लागले आणि मीठ व मिरपूडीच्या डब्यांवरील डाग पुसून टाकू लागले; बाथरूममधील पेपर टॉवेल बदलून ठेवू लागले. आणि हे असेच चालू राहिले.

ही नोकरी सुरू करून साधारण सहा महिने झाल्यानंतर, एक दिवस रेस्टॉरंटचे मालक माझ्याजवळ येऊन मला म्हणाले की, ते माझ्या कामावर लक्ष ठेऊन होते. त्यांनी कधीच असा समर्पित कर्मचारी पाहिला नव्हता; त्यांचा विश्वासच बसत नव्हता की, वेट्रेसचे असे एक कंटाळवाणे कामदेखील मी काहीही न म्हणता करत होते! पण मी हे जाणत होते की, जे काही ते पाहात होते, ते होते माझ्या कार्यांमध्ये कार्यान्वित झालेले गुरुमाईंचे मार्गदर्शन!

नंतर, त्यांनी मला मॅनेजरचे पद देऊ केले, जे मी आनंदाने स्वीकारले. चार किंवा पाच महिन्यानंतर त्यांनी मला इव्हेंट मॅनेजरचे पद देऊ केले, जे मी स्वीकारले आणि मग पुढील पाचएक महिन्यानंतर त्यांनी माझ्यासमोर त्यांच्या नवीन हॉटेलमध्ये मला भागीदार करून घेण्याचा प्रस्ताव ठेवला.

त्यावेळी जरीही व्यवसायातील ही विशिष्ट संधी मी स्वीकारली नाही, तरी त्यापुढच्या काळात मी स्वतःचाच एक अत्यंत यशस्वी व्यवसाय सुरू केला. आणि कालपरत्वे माझ्या जीवनातील इतर कितीतरी क्षेत्रांमध्येही भरभराट होत असताना मी पाहिले आहे. मी जाणते की, मला जे यश मिळाले आहे, ते गुरुमाईंचे मार्गदर्शन — की, मी स्वतःला शत प्रतिशत द्यावे — याला लागू करण्याचेच फळ आहे.

धन्यवाद, गुरुमाई.

श्रीगुरुमाईंसोबतचा प्रसंग : ४

वाणी अग्रवाल

वर्ष १९८०मध्ये, मी गुरुदेव सिद्धपीठात एक गुरुकुल विद्यार्थिनी होते. गुरुकुल जीवनातील प्रत्येक क्षणाचा मी आनंद घेत असे. मला सिद्धयोग अभ्यास — श्रीगुरुगीतेचा पाठ, ध्यान, सेवा, इत्यादी नियमिततेने करणे खूप आवडत असे आणि प्रत्येक सकाळी आपल्या दिवसाची सुरुवात करण्याची मी अधीरतेने वाट पाहायची.

आणि एके दिवशी, अचानक माझ्या मनात वायफळ विचारांचा अखंड प्रवाह सुरू झाला. अनेक प्रश्न, अनेक शंका माझ्या मनात उठू लागल्या : ‘मी आश्रमात का आहे? गुरु-तत्त्व काय आहे? मी काय करते आहे? गुरू कोण आहेत?’ काहीही सत्य वाटत नव्हते — काहीच नाही.

हे माझ्यासाठी अतिशय कष्टप्रद होते. माझ्या अंतःकरणात मी हे जाणत होते की, गुरुमाई माझ्या गुरू आहेत, आणि हेदेखील की, हा माझा मार्ग आहे. मला अनेक रूपांतरणकारी अनुभव आलेले आहेत. मला हे माहीत होते की, हा केवळ माझ्या मनाचा एक खेळ होता — अहंकार आपल्या शक्तीची जाणीव करून देत होता. आणि तरीदेखील मी माझ्या मनाचे म्हणणे ऐकण्यास सुरुवात केली; या सर्व प्रश्नांचा माझ्यावर परिणाम होऊ लागला.

तीन महिने लोटले. पुरे झाले आता, मी यापुढे ते सहन करू शकत नव्हते. माझे मन शांत करण्यासाठी मनोमन मी गुरुमाईंकडे कृपायाचना केली की, त्यांनी माझ्या मनाला शांत करावे. मी त्यांच्या साहाय्याकरता प्रार्थना केली, जेणेकरून मी माझ्या मनाच्या वटवटीपासून माझी सुटका करून घेऊ शकेन.

दोन दिवसांनंतर, ज्यावेळी मी अन्नपूर्णा भोजन कक्षामध्ये प्रवेश करत होते, त्यावेळी गुरुमाईंना हॉलच्या मागे पायऱ्यांवर बसलेले पाहिले. त्या एकट्याच बसल्या होत्या. मी जाऊन त्यांच्याजवळ उभी राहले. गुरुमाईंनी माझ्याकडे पाहिले आणि म्हणाल्या "कुछ कहना है?" म्हणजेच "तुला काही सांगायचे आहे का?" मी होकारार्थी मान डोलावली. मग मी त्यांच्याजवळ गेले, त्यांना प्रणाम केला आणि त्यांच्या पायांपाशी बसले. गेले तीन महिने माझ्या मनात जे चालले होते, माझ्या सर्व शंका, माझे सर्व प्रश्न, या सर्वांविषयी मी गुरुमाईंना सांगितले. मी त्यांच्यापासून काहीही लपवले नाही.

गुरुमाईंनी मी सांगितलेली प्रत्येक गोष्ट लक्षपूर्वक ऐकली . . . . आणि मग त्या खळखळून हसू लागल्या. त्या खूप हसल्या, हसत राहिल्या आणि हसतच राहिल्या. अचानक मीसुद्धा त्यांच्या आनंददायी हास्यात सामील झाले. गुरुमाई म्हणाल्या, "तुला नेति-नेतिचा एक महान अनुभव होतो आहे. वेदान्त म्हणतात, 'हे सत्य नाही, ते सत्य नाही.' काहीही सत्य नाही."

गुरुमाईंनी अत्यंत करूणेने आणि कोमलतेने माझ्याकडे पाहिले आणि त्या म्हणाल्या, "सर्व काही ठीक आहे. जा आणि आराम कर. तुला विश्रांतीची गरज आहे." आणि मग त्या निघून गेल्या.

मला माझ्या ऑफिसमधील काही काम संपवायचे होते, त्यामुळे मी विचार केला, 'मी माझ्या ऑफिसमध्ये जाऊन माझे काम संपवते आणि मग माझ्या खोलीत जाईन.'

दोन तासांनंतर, मी जेव्हा माझ्या ऑफिसमधून बाहेर येत होते, तेव्हा गुरुमाई तिथेच बाहेर कोणाशी बोलत उभ्या होत्या. त्यांनी मला पाहिले आणि विचारले, "तू विश्रांती घेण्यासाठी गेली नाहीस का?" त्यांनी माझ्याकडे भेदक नजरेने पाहिले आणि म्हणाल्या, "जेव्हा गुरू आज्ञा देतात, तेव्हा त्याच वेळी त्या आज्ञेचे पालन करा."

मी माझ्या खोलीत गेले. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. मी माझ्या खोलीतील सर्व पडदे बंद केले आणि अंथरूणावर पडले. मला लगेच झोप लागली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मी जेव्हा उठले, तेव्हा मला एकदम ताजेतवाने व उल्हसित वाटत होते. मला वाटले की, जणू काही मी एक वेगळीच

व्यक्ती आहे. माझ्या सर्व शंका दूर झाल्या होत्या. असे वाटत होते की, जणू काही ते तीन महिने कधी अस्तित्वातच नव्हते.

मी माझ्या पूजेत असलेल्या गुरुमाईंच्या फोटोकडे पाहिले आणि माझे हृदय कृतज्ञतेने भरून गेले. मी गुरुमाईंचे प्रेम आणि करुणा यांना अत्यंत स्पष्ट रूपात अनुभवले होते.

धन्यवाद, गुरुमाई.

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.